पान नं.१ वरून...

# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे...

डॉ.परवेझ ग्रँट म्हणाले, या कार्याचा मला अत्यंत आनंद होतो. आम्ही साताऱ्यातील रुबी हॉस क्लिनीकमध्ये मुकुल माधव फाऊंडेशनसाठी एक खास खोली ठेवली आहे. आमचे तज्ज्ञ व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारे रुग्णांना मार्गदर्शन करतील.

या कार्यक्रमात एकूण पाच व्हिलचेयर्स, पाच कमोड व्हिलचेयर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुकुल माधव फाऊंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना. आतापर्यंत ७४ व्हिलचेयर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत. आणखी ३६ खुर्च्या येत्या सोमवारी जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमात काही सांस्कृतिक कार्यक्रम झाले. त्यात सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांनी भाग घेतला. या दृश्याने सर्व उपस्थित भावूक झाले.